सकाळ



गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे मदतीची रक्कम देताना एम. एल. चौगुले. शेजारी प्रा. व्ही. के. मायदेव, प्रा. विजय आरबोळे, मीना रिंगणे, डी. के. मायदेव, सागर माने, बाबासाहेब मार्तंड, विशाल रोटे आदी.

# कॅन्सरग्रस्त तरुणाच्या उपचारांसाठी 'रवळनाथ'कडून १५ हजारांची मदत

गडहिंग्लज, ता. ४ : येथील श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे कॅन्सरग्रस्त तरुण अमर नाईक याला मदतीचा हात देण्यात आला. त्याच्यावरील उपचारांसाठी १५ हजार रुपये दिले. 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी मदतीची रक्कम अमरची आई श्रीमती मालूताई यांच्याकडे सुपूर्द केली.

अमर येथील नगरपालिकेत कंत्राटी कर्मचारी आहे. दोन वर्षांपूर्वी त्याच्या मोठ्या भावाचे मेंदूच्या कर्करोगाने निधन झाले. त्यापाठोपाठ वडिलांचेही निधन झाले. आई व आत्या धुणी-भांडी करतात. दरम्यान, अमरला रक्ताचा कर्करोग झाल्याचे निदान झाले. उपचारासाठी १० लाख रुपयांचा खर्च आहे. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने नगराध्यक्षा स्वाती कोरी यांनी मदतीचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत 'रवळनाथ'ने मदत दिली.

या वेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्रा. विजय आरबोळे, संचालिका प्राचार्या मीना रिंगणे, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, विशाल रोटे उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
05/05/2021 Page No. 4

तरुण भारत बुधवार, ५ मे २०२१

# अमरच्या उपचारासाठी 'रवळनाथ' कडून मदत

प्रतिनिधी
गडहिंग्लज

रवळनाथ को–ऑफ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे येथील कॅन्सरग्रस्त तरुण अमर नाईक याच्या उपचारासाठी १५ हजाराची मदत देण्यात आली.

अमर हा गडहिंग्लज नगरपालिकेत कंत्राटी कामगार म्हणून काम करतो. दोन वर्षापूर्वी त्याच्या मोठ्या भावाचे मेंदूच्या कर्करोगाने निधन झाले. त्यापाठोपाठ त्याच्या वडिलांचेही आकस्मित निधन झाले. त्याची आई व आत्या दोघी धुणी–भांडी करुन घरखर्च चालवितात. दरम्यान, अमरला रक्ताचा कर्करोग झाल्याने त्याच्या कुटुंबावर आभाळ कोसळले आहे.

अमरच्या उपचारासाठी सुमारे १० लाखाचा खर्च सांगण्यात आला आहे. परंतु त्याच्या घरची परिस्थिती नाजूक असल्याने ही रक्कम कुटुंबाच्या आवाक्याबाहेरील आहे. त्यामुळे नगराध्यक्षा स्वाती कोरी यांनी दानशूर व्यक्ती आणि संस्थांना मदतीचे आवाहन केले होते. त्यानुसार ही मदत करण्यात आली. रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते अमरच्या आत्या मालूताई नाईक यांच्याकडे १५ हजार रोख मदत सुपूर्द करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, प्रा. विजय आरबोळे, प्राचार्या मीना रिंगणे, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासो मार्तंड, विशाल रोटे उपस्थित होते.




**गडहिंग्लज : अमर नाईक याच्या वैद्यकीय उपचारासाठी मालूताई नाईक यांच्याकडे मदत सुपूर्द करताना एम. एल. चौगुले, प्रा. व्ही. के. मायदेव, प्रा. विजय आरबोळे, मीना रिंगणे, डी. के. मायदेव व इतर.**

पुढारी



गडहिंग्लज : 'रवळनाथ'तर्फे अमर नाईक याच्यावर वैद्यकीय उपचारासाठी १५ हजारांची मदत देताना एम. एल. चौगुले. शेजारी व्ही. के. मायदेव, विजय आरबोळे, मीना रिंगणे, डी. के. मायदेव, सागर माने, बाबासो मार्तंड, विशाल रोटे आदी.

# अमरच्या उपचारासाठी 'रवळनाथ'कडून १५ हजार

**गडहिंग्लज (पुढारी वृत्तसेवा) :** रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे येथील कॅन्सरग्रस्त तरुण अमर नाईक याच्या उपचारासाठी १५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. अमर हा गडहिंग्लज नगरपालिकेत कंत्राटी कामगार म्हणून काम करतो. दोन वर्षांपूर्वी त्याच्या मोठ्या भावाचा मेंदूच्या कर्करोगाने मृत्यू झाला. त्यापाठोपाठ त्याच्या वडिलांचेही आकस्मित निधन झाले. त्याची आई व आत्या दोघी धुणी-भांडी करून घर खर्च चालवितात. दरम्यान, अमरला रक्ताचा कर्करोग झाल्याने त्याच्या कुटुंबावर आभाळ कोसळले आहे. अमरच्या उपचारासाठी सुमारे १० लाखांचा खर्च सांगण्यात आला आहे. परंतु, त्याच्या घरची परिस्थिती बेताची असल्याने ही रक्कम त्याच्या कुटुंबाच्या आवाक्याबाहेरील आहे. त्यामुळे नगराध्यक्षा स्वाती कोरी यांनी दानशूर व्यक्ती आणि संस्थांना मदतीचे आवाहन केले होते. त्यानुसार ही मदत करण्यात आली. 'रवळनाथ'चे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते अमरच्या आत्या मालूताई नाईक यांच्याकडे १५ हजार रुपयांची रोख मदत सुपूर्द करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक प्रा. विजय आरबोळे, संचालिका प्राचार्या मीना रिंगणे, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासो मार्तंड, विशाल रोटे आदी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
May 7, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

लोकमत



गडहिंग्लज येथे 'रवळनाथ'तर्फे एम. एल. चौगुले यांनी अमरच्या आत्या मालूताई नाईक यांच्याकडे आर्थिक मदत सुपुर्द केली. यावेळी वासुदेव मायदेव, मीना रिंगणे, दत्तात्रय मायदेव, विजय आरबोळे, आदी उपस्थित होते.

# 'अमर'च्या उपचारासाठी 'रवळनाथ'कडून मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे येथील कॅन्सरग्रस्त तरुण अमर नाईक याच्या उपचारासाठी १५ हजारांची मदत देण्यात आली.

अमर हा गडहिंग्लज नगरपालिकेत कंत्राटी कामगार म्हणून काम करतो. दोन वर्षांपूर्वी त्याच्या मोठ्या भावाचे मेंदूच्या कर्करोगाने निधन झाले. त्यापाठोपाठ त्याच्या वडिलांचेही आकस्मिक निधन झाले. त्याची आई व आत्या दोघी धुणी-भांडी करून घरखर्च चालवितात.दरम्यान, अमरला रक्ताचा कर्करोग झाल्याने त्याच्या कुटुंबावर आभाळ कोसळले आहे. त्याच्या उपचारासाठी सुमारे १० लाखांचा खर्च अपेक्षित आहे. परंतु, ही रक्कम त्याच्या कुटुंबाच्या आवाक्याबाहेरील आहे. त्यामुळे नगराध्यक्षा प्रा. स्वाती कोरी यांनी दानशूर व्यक्ती आणि संस्थांना मदतीचे आवाहन केले होते. त्यानुसार ही मदत करण्यात आली.'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते 'अमर'च्या आत्या मालूताई नाईक यांच्याकडे रुपये १५ हजारांची रोख मदत सुपूर्द केली.

यावेळी उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, संचालक प्रा. विजय आरबोळे, संचालिका प्राचार्या मीना रिंगणे, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव, प्रशासन अधिकारी सागर माने, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, विशाल रोटे, आदी उपस्थित होते.